अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचा परिवीक्षा कालावधी समाप्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग

शासन आदेश क्रमांक- ईएसटी १०१९/प्र.क्र.१८ /का-१४२७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
६ वा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २२ मार्च २०१९

वाचा :- १) नियोजन विभाग, शासन आदेश क्रमांक - नामनि १२१५/प्र.क्र.११८/का.१४२७, दिनांक ३०/१/२०१६

२) नियोजन विभाग, शासन आदेश- नामनि १२१५/प्र.क्र.११८/का.१४२७, दिनांक २०/५/२०१६

३) अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे पत्र क्र.परिवि १४१७/गट-ब (राज) / ७५/प्रशा-२/१५६, दिनांक१३ फेब्रुवारी २०१९

४) अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे पत्र क्र.परिवि १४१७/गट-ब (राज) / ७५/प्रशा-२/१७१, दिनांक१८ फेब्रुवारी २०१९

५) अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे पत्र क्र.परिवि १४१७/गट-ब (राज) / ७५/प्रशा-२/२०६, दिनांक२ मार्च २०१९

कार्यालयीन आदेश :

नियोजन विभागाचे संदर्भाधीन क्र.१ वरील शासन आदेशान्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील संशोधन अधिकारी / सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील पदावर पदावर ३७ अधिकाऱ्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी ३ अधिकाऱ्यांनी नियुक्ती नाकारली असल्याने; नियोजन विभागाचे संदर्भाधिन क्रमांक २ च्या शासन आदेशान्वये सदर ३ अधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात आले आहेत.

२. नियोजन विभागाचे संदर्भाधीन क्रमांक १ वरील नियुक्ती आदेशात संबंधित अधिकारी दोन वर्षे परिविक्षा कालावधीवर राहतील, असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यांना नियुक्ती आदेशात नमूद केल्याप्रमाणे, दोन वर्षांच्या कालावधीत विहित विभागीय परीक्षा (जर काही असल्यास) आणि संगणक हाताळणी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते. तसेच, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा त्यातून सूट मिळणे आवश्यक होते. तसेच सदरहु दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीत परिविक्षा अधिकाऱ्यांनी जर रजा उपभोगलेली असेल; तर त्या रजेच्या कालावधीएवढा परिविक्षा कालावधी शासन परिपत्रक क्र.५३४६/४६, दिनांक २६ ऑगस्ट, १९५२ नुसार वाढविणे आवश्यक आहे.

३. नियोजन विभागाचे संदर्भाधिन आदेश क्रमांक १ अन्वये संशोधन अधिकारी / सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित) संवर्गात नियुक्त करण्यात आलेल्या एकूण३४ अधिकाऱ्यांपैकी, विहित अटी व शर्तींची पूर्तता होत असलेले अधिकारी व त्यांनी उपभोगलेल्या रजा विचारात घेऊन विवरणपत्रात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास परिविक्षा कालावधी संपुष्टात आणण्यात येत आहे. संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी, गट-ब (राजपत्रित) संवर्गात खालील १८ अधिकाऱ्यांना नियमित /स्थानापन्न नियुक्ती देण्यात येत आहे :-

अ.क्र.	परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचे नांव	नियुक्ती दिनांक	परिविक्षा कालावधी संपुष्टात आल्याचा दिनांक
१	२	३	४
१	श्रीमती प्रियांका रामदास बोकील	०३/०२/२०१६	१९/०३/२०१८
२	श्रीमती शुभांगी विष्णू रायते	२३/०२/२०१६	२९/०३/२०१८
३	श्री.प्रसाद धनराज घाडगे	०२/०२/२०१६	२५/०३/२०१८
४	श्रीमती सविता भास्कर मुळीक	०९/०२/२०१६	०१/०४/२०१८
५	श्री.सुचित बाबुराव कुलकर्णी	२७/०२/२०१६	११/०३/२०१८
६	श्री.दिनेश भिकु काळे	०५/०२/२०१६	१६/०३/२०१८
७	श्री.प्रमोदराव साहेबराव पाटील	१३/०२/२०१६	१४/०३/२०१८
८	श्री.भगवान शंकर पवार	०५/०२/२०१६	१२/०४/२०१८
९	श्रीमती सुप्रिया जयसिंग हजारे	०९/०२/२०१६	१४/०२/२०१८
१०	श्री.श्रीकांत देशीकेंद्र कुंटला	०८/०२/२०१६	२३/०२/२०१८
११	श्रीमती राजश्री श्रीधर भिसे (श्रीम.लता नाना धायगुडे)	०३/०२/२०१६	०७/०३/२०१८
१२	श्रीमती तृप्ती नानासाहेब घाडगे (श्रीमती तृप्ती कुणाल निंबाळकर)	२६/०२/२०१६	०२/०४/२०१८
१३	श्रीमती सुनेत्रा भास्कर दरे (श्रीमती सुनेत्रा जयंत पाटील)	२६/०२/२०१६	२८/०३/२०१८
१४	श्री.सचिन मारुती माघाडे	१०/०२/२०१६	१०/०३/२०१८
१५	श्री.सुधीर रामचंद्र अडसूळ	११/०२/२०१६	०१/०३/२०१८
१६	श्री.सतीश वसंत रास्ते	११/०२/२०१६	०६/०३/२०१८
१७	श्री.अमित शामराव सुतार	२५/०२/२०१६	०१/०३/२०१८
१८	श्रीमती मोना सुर्यकांत पवार-वाघवकर	०३/०२/२०१६	१०/०३/२०१८

४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९४/१८३७/ प्र.क्र.१८/ ९५/आठ, दि.२८ मार्च, १९९५ नुसार सूचना लक्षात घेऊन हे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२२१५४०५४५८१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vanita Narayan Jadhav

Digitally signed by Vanita Narayan Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f0e1884948542877a779b797fc357f1c34d84fe1aa3f9bdc30c060e0431223f, serialNumber=ad56893b2ddc6497ed23d778715c30a6ea094f5d1e0fb38a44ac5b9179a65d83, cn=Vanita Narayan Jadhav
Date: 2019.03.22 17:02:02 +05'30'

(वनिता ना. जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२) सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, कोकण विभाग, नवी मुंबई/नाशिक/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद.
३) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई/नाशिक/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद.
४) संबंधित अधिकारी (मार्फत - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई).
५) निवड नस्ती.